# विभागाचे नाव : वन विभाग - वेबसाईट www.mahaforest.gov.in

100 दिवस कार्यक्रमाची सद्यस्थिती निहाय माहिती

| अ. क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण/अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबची माहिती व शासन निर्णय/फोटो/इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | बिबट निवारा केंद्रात अतिरिक्त १०० बिबटयांना ठेवण्याची व्यवस्था करणे. | कार्यवाही पुर्ण | • टप्पा-१ मध्ये जुन्नर येथिल बिबट निवारा केंद्रात ४० बिबट्यांची निवासाची व्यवस्था करण्याच्या बांधकामाच्या निविदेस दिनांक १२.१२.२०२४ रोजी शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार जागेवर बांधकाम सुरु आहे.<br>• टप्पा-२ मध्ये जुन्नर येथील बिबट निवारा केंद्रात ४० बिबटयांची निवासाची व्यवस्था करण्याच्या कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून रु.१३५१.८४ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.<br>• यासोबतच पुणे वन विभागातील बावधन ट्रांन्झीट ट्रीटमेंट सेंटर मध्येही बिबट पिंज-याकरिता रु.४६०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.<br>त्यानुषंगाने शासन निर्णय क्र.डब्ल्युएलपी-०६.०४/प्र.क्र.१२९/फ-१, दिनांक १२ डिसेंबर, २०२४, शासन निर्णय क्र.डब्ल्युएलपी-०६.०४/प्र.क्र.१२९/फ-१, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२५ व शासन निर्णय क्र.डब्ल्युएलपी-०६.०४/प्र.क्र.१२९/फ-१, दिनांक ३१ मार्च, २०२५ निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | पिक नुकसान / मनुष्य जखमी / पशुधन हानी प्रकरणात अर्ज सादर करण्यासाठी मोबाईल ॲप सुविधा निर्माण करणे. | कार्यवाही पुर्ण | • महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम- २०२३, दिनांक ३१.०१.२०२४ रोजी लागू करण्यात आलेला आहे.<br>• याकरिता अर्ज mahaforest.gov.in या संकेतस्थळावर RTS (सेवा हमी कायदा) अंतर्गत करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.<br>• तसचे उपरोक्त कायद्याच्या अनुषंगाने सदर सुविधा मोबाईल ॲपव्दारे देण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार सदर सुविधा मोबईल ॲप व्दारे सुरु करण्यात आली आहे. सदर मोबाईल ऑप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.<br><br> | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | पारंपरिक देवराई जतन करण्यासाठी कार्यप्रणाली तयार करणे. | कार्यवाही पूर्ण | • महाराष्ट्रातील पारंपारिक देवराईंची यादी जैवविविधता मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून तयार करण्यात आली असून, यासंदर्भातील Compendium प्रकाशित करण्यात आले आहे.<br>• पारंपारिक देवराईंचे जतन करण्यासाठी कार्यप्रणाली (SOP) तयार करणे.<br>• पारंपारिक देवराई जतन करण्यासाठी Compendium मध्ये नमूद केलेल्या देवराईंचे जतन करण्यासाठी कार्यप्रणाली (SOP) तयार करण्यात आली आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय क्र.डब्ल्यूएफपी-०४.२५/प्र.क्र.१०६/फ-१, दिनांक २३.०४.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.<br>PDF<br>202504231619165919.pdf | -- |
| ४ | अधिसूचित राखीव वनामध्ये १०००० हेक्टरने वाढ करणे. | कार्यवाही पूर्ण | शासनाची मालमत्ता असलेले अवर्गीकृत व पर्यायी वनीकरणांतर्गत प्राप्त क्षेत्राच्या प्रभावी संरक्षणाकरीता त्यास “राखीव वनाचा” दर्जा प्राप्त होणे आवश्यक आहे. यास्तव अशा जमिनींचा आढावा घेण्यास्तव क्षेत्रिय स्तरावर बैठका तसेच उचित मार्गदर्शन प्रशासनाच्या स्तरावरुन करण्यात आले. तद्नंतर संबंधित क्षेत्राची स्थळ पहाणी करण्यात येऊन चौकशीची कार्यवाही पूर्ण करुन सदरचे क्षेत्र “भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम २० अंतर्गत अंतिमत: “राखीव वने” म्हणून अधिसूचीत करण्यात आले.<br>विभागास एकूण १०,००० हे.क्षेत्राचे उद्दिष्ट प्राप्त होते. उद्दिष्टापेक्षा ९०६० हेक्टर अतिरिक्त क्षेत्र अंतिमत: राखीव वन म्हणून घोषित करण्यात येऊन उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला आहे. राज्यातील एकूण राखीव वनक्षेत्रामध्ये एकूण १९,०६० हेक्टर क्षेत्राची वाढ झाली आहे. या अनुषंगाने निर्गमित केलेल्या अधिसूचना https://egazzete.mahaonline.gov.in/ Forms/GazetteSearch.aspx?MenuID=1124 या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. | |
| ५ | वृक्षतोड अधिनियम १९६४ मध्ये आवश्यक सुधारणा करणे. | अपूर्ण | नैसर्गिक जंगलाबाहेर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता असून वनेत्तर क्षेत्रात वृक्षारोपणास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.<br>महाराष्ट्र शासनाने Ease of Doing Business policy ला अनुसरुन वन विभागाच्या २७ एप्रिल, २०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये वृक्षतोड आणि वाहतूक परवानगीसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. खाजगी जमीन मालक, शेतकरी, जमीन देणी देणाऱ्या संस्था, वित्तीय संस्था, उद्योग आणि वनजमिनीव्यतिरिक्त इतर जमिनधारकांना वृक्षारोपणास गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देण्याकरिता वृक्षतोडीच्या परवानगी मिळण्याची प्रक्रीया सुलभ करण्याच्या दृष्टीने अधिनियमामध्ये सुधारणा प्रस्तावित आहे. | सदर प्रकरणी कार्यवाही प्रगती पथावर आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | अभयारण्यातुन विस्थापीत होणाऱ्या नागरिकांचे पुर्नवसन करण्यासाठी सुधारीत धोरण आणणे. | अपूर्ण | **१) सहयाद्री व्याघ्र प्रकल्पातील बाधित होणा-या कुटुंबांना पर्यायी जमिनीऐवजी रोख रक्कम देणे.**<br>• चांदोली राष्ट्रीय उद्यानातील प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यासाठी पुरेशी जमीन उपलब्ध नसल्याने उर्वरित प्रकल्पग्रस्तांना देय जमीनीऐवजी रोख रक्कम अदा करणे प्रस्तावित आहे.<br>**२) अभयारण्यातुन विस्थापीत होणाऱ्या नागरिकांना पुनर्वसन कायद्यातील कलम ११ व १३ चे अभावी प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाचे लाभ देणे.**<br>• सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील बाधीत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणेकामी उपरोक्त परिस्थितीत पुनर्वसन करावयाच्या गावांसाठी कलम ११ व १३ च्या अधिसूचना पुर्वलक्षी प्रभावाने काढणे शक्य नसल्याने, विशेष बाब म्हणुन सदर पुनर्वसन प्रस्तावित एकुण ३४ गावांकरिता कलम ११ व १३ च्या अधिसूचना काढण्यात आल्या असल्याचे गृहित धरल्यास प्रकल्पग्रस्तांना महाराष्ट्र प्रकल्प बाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ नुसार पर्यायी जमीन व जे इतर सर्व लाभ प्राप्त होवू शकतील, असे सर्व लाभ वितरीत करण्याचे प्रस्तावित आहे. | सदर प्रकरणी कार्यवाही प्रगती पथावर आहे. |
| ७ | मानव वन्यजीव संघर्ष नियंत्रित करण्यासाठी समर्पित जलद बचाव दलाची स्थापना करणे. | अपूर्ण | वन्यप्राणी हे फक्त वन्यजीव संरक्षीत क्षेत्र किंवा वनक्षेत्रापुरते मर्यादित नसुन त्यांचे वास्तव्य वन विरहीत क्षेत्रामध्येही आहे. त्यामुळे राज्यात मानव वन्यजीव संघर्षामध्ये उत्तरोत्तर वाढ होत आहे. वन्यजीव अधिवास संवर्धन व संरक्षणास उच्चतम प्राधान्य देवून मानव वन्यजीव सहजीवन प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे. यासाठी मानव वन्यजीव संघर्षाचे प्राधान्याने निराकरण करण्यासाठी समर्पीत जलद प्रतिसाद दल निर्माण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. | सदर प्रकरणी कार्यवाही प्रगती पथावर आहे. |
| ८ | सुधारित विद्यार्थी हरीत सेना योजनेअंतर्गत -चला जाणुया वनाला उपक्रम राबविणे. | अपूर्ण | केंद्र शासनाच्या “राष्ट्रीय हरित सेना” योजनेंतर्गत इको क्लब स्थापन करण्यात आलेल्या ८८०७ शाळा/महाविद्यालयामध्ये दि.०६.०३.२०१७ च्या शासन निर्णय अन्वये राज्य शासनाची **“विद्यार्थी हरित सेना”** ही योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेत राज्यातील १०,००० शाळांचा नव्याने समोवश करून तसेच वने व वन्यजीवांविषयी प्रत्यक्ष अनुभूती घेण्यास प्रोत्साहन देण्यासाठी **“चला जाणूया वनाला”** या नवीन संकल्पनेचा **“विद्यार्थी हरित सेना”** या योजनेमध्ये समावेश करून सदर योजनेचे बळकटीकरण करणेबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याचे प्रस्तावित आहे. | सदर योजना ही वन व पर्यावरण संर्वधनासाठी महत्वाची असल्याने सदर योजना सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | वाघ / बिबट गावात येताच नागरिकांना धोक्याची सुचना देण्यासाठी AI (कृत्रिम बुध्दिमत्ता) तंत्रज्ञानावर आधारीत ड्रोन व आभासी भिंत यंत्रणा उभारणे. | अपूर्ण | • वनक्षेत्राजवळील गावांमध्ये वरील घटना मोठया प्रमाणात आढळुन येतात. त्यामुळे नागरिकांचा वन विभागाविरोधात रोष निर्माण होतो.<br>• AI (कृत्रिम बुध्दिमत्ता) तंत्रज्ञानावर आधारीत आभासी भिंत यंत्रणा प्रायोगिक तत्वावर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर यंत्रणेमुळे नागरिकांना वाघ / बिबट व इतर हिंस्र प्राणी नागरी वस्ती मध्ये येताच धोक्याची सुचना नागरिकांना पोहचविणे शक्य झाले आहे.<br>• त्याच धर्तीवर उपरोक्त यंत्रणा मोठया प्रमाणात वन्यप्राणी संवेदनशील गावांमध्ये कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. | प्रस्तुत प्रकरणी क्षेत्रीय स्तरावर निरंतर कार्यवाही सुरु आहे. |